# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९८०

ई-मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-४०/नोंदणी/२०१६/5684 दिनांक – 3 SEP 2016

## परिपत्रक

विषय: शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी विद्यार्थ्यांचे Enrollment व परिक्षा अर्जाचे वेळापत्रक

संदर्भ: Academic Calender वर्ष २०१६-१७ - MSBTE/D-40/Academic Calender/B2/2016/199 दि. ०३/०५/२०१६

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रथम सत्रासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन नोंदणी अर्ज निश्चित करण्यासाठी व परिक्षा अर्ज भरण्याकरिता सुधारित वेळापत्रक खालील प्रमाणे घोषित करण्यात येत आहे.

| नोंदणी प्रक्रीया वेळापत्रक | | |
|---|---|---|
| १ | संस्थास्तरावर नोंदणी निश्चिती | दि. ०८/०९/२०१६ ते दि. १७/०९/२०१६ |
| २ | विभागीय कार्यालय स्तरावर नोंदणी निश्चिती | दि. १२/०९/२०१६ ते दि.२२/०९/२०१६ |

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नविन नोंदणी झालेल्या व A,O,N,R,S ( Yearly Pattern) मधील सर्व विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज भरण्याचे वेळापत्रक

| अनु. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | परिक्षा अर्ज भरणे ( नियमित शुल्कासह) | दि. २९/०९/२०१६ पर्यंत |
| २ | परिक्षा अर्ज भरणे ( नियमित शुल्क व रु. २००/- दंडासह) | दि. ३०/०९/२०१६ ते दि. ०३/१०/२०१६ |
| ३ | परिक्षा अर्ज भरणे ( नियमित शुल्क व रु. १५००/- दंडासह) | दि. ०४/१०/२०१६ ते दि. ०७/१०/२०१६ |
| ४ | विभागीय कार्यालय स्तरावर परिक्षा अर्ज निश्चिती | दि. ०७/१०/२०१६ सायं. ५ वाजेपर्यंत |

**नोंदणी प्रक्रियेत खालील महत्वाचे बदल करण्यात आले आहेत.**

१) AICTE अभ्यासक्रमासाठी DTE Portal वर अपलोड केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांनाच नोंदणी करता येईल.

२) NON AICTE ( MSBTE approved Short Term Courses) अभ्यासक्रमासाठीची नोंदणी व गुणवत्ता यादी मागील वर्षाप्रमाणे विभागीय कार्यालयामार्फत तपासणी करूनच नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

३) नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय अधिकतम प्रवेशक्षमतेपर्यंत मर्यादित राहील. अधिकतम क्षमतेवरील विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी त्याच्या विशिष्ट प्रवर्गासाठी संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या परवानगीचे पत्र आवश्यक राहील.

४) एका विद्यार्थ्याचे नोंदणी प्रक्रियेत एकदाच नामांकन करता येईल. एकाच विद्यार्थ्याचे त्याच अथवा इतर संस्थेत नोंदणी झाल्याचे आढळल्यास त्याची जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील.

५) DTE स्तरावरील प्रवेशित संस्था व अभ्यासक्रमातच नोंदणी करणे अनिवार्य आहे.संस्था अथवा अभ्यासक्रम बदलल्याचे आढळल्यास त्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांवर राहील.

६) शाखाबदल किंवा संस्थाबदल विद्यार्थ्याबाबत तंत्रनिकेतनातील प्रवेशाबाबतच्या माहिती पुस्तिकेतील (Information Broucher for Admission to Full Time Professional Diploma Technical Courses Year 2016-17, State CET Cell, Maharashtra State, Mumbai) पान क्र. ४० वरील क्र. २० नुसार परिक्षा अर्ज स्विकृतीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

७) ऑनलाईन प्रक्रियेत विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) हा महत्त्वाचा टप्पा असून सदर प्रक्रिया अचूकतेने करण्यात यावी. विशेषतः विद्यार्थ्यांचे नाव हे शालांत परीक्षेच्या प्रमाणपत्राप्रमाणेच असणे आवश्यक आहे. फोटोसह स्वाक्षरी असलेली अचूक इमेज अपलोड करणे बंधनकारक आहे. केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून प्राप्त फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज चांगल्या प्रतीची नसल्यास त्याऐवजी नवीन स्कॅन केलेली फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज अपलोड करण्यात यावी. नोंदणी प्रक्रियेनंतर इमेज (फोटोसह स्वाक्षरी) बदलासाठी मंडळाकडे अर्ज केल्यास रु. ५००/- दंड आकारुनच वर्ष २०१६-१७ पासून नोंदणी झालेल्या विद्यार्थांचे फोटोसह स्वाक्षरी मध्ये बदल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

८) विहीत मुदतीतील सर्व अर्ज कन्फर्म केल्यानंतर अथवा संस्थेमार्फत रु. १५००/- दंड आकारून स्विकारलेला शेवटचा परिक्षा अर्ज विभागीय कार्यालयात कन्फर्म करताना संस्थाप्रमुखांना सोबत जोडलेले हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

फॉर्म भरण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दि. ०७/१०/२०१६ रोजी विद्यार्थी, संस्था व विभागीय कार्यालय यांच्यामार्फत कन्फर्म झालेले परीक्षा अर्जच हिवाळी परिक्षा-२०१६ करीता ग्राह्य धरण्यात येतील. उपरोक्त विहीत केलेल्या मुदतीनंतर म्हणजेच दि. ०७/१०/२०१६ नंतर हिवाळी परिक्षा-२०१६ साठी परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदतवाढ देण्यात येणार नाही.

नोंदणी प्रक्रीयेतील कोणतीही अडचण सोडविण्यासाठी संस्थेच्या लॉगिन मधील मेसेज सिस्टीम मधूनच MSBTE Support शी संपर्क साधण्यात यावा.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत —

१) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१ यांना माहितीस्तव सादर.

२) प्राचार्य, म. रा.तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व संस्था

३) उपसचिव, म. रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद